महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:-९६६(९)/३५८४/पंधरा दिनांक- २३ ऑगस्ट, २०२३

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय**- वरिष्ठ संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, गट-अ (श्रेणी-२) (जाहिरात क्रमांक १५/२०२०) च्या अनुषंगाने प्रमाणपत्रे अपलोड करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वरिष्ठ संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, गट-अ (श्रेणी-२) (जाहिरात क्रमांक १५/२०२०) या पदासाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेतून अर्हता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलद्वारे केलेल्या अर्जातील विविध दाव्याच्या अनुषंगाने पात्रता तपासण्याकरीता खाली नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | प्रमाणपत्रे/कागदपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरवा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरवा-जाहिरातीतील मुद्दा क्रमांक ४.४ मध्ये नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे | PDF | ५० | ५०० |
| ४ | अनुभवाचा पुरावा/प्रमाणपत्र जाहिरातीमधील मुद्दा क्रमांक ४.५ मध्ये नमूद केल्यानुसार | PDF | ५० | ५०० |
| ५ | सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ७ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १२ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १३ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १६ | महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांकरीता वयोमर्यादेतील सवलतीचे पुरावे/प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

२. उपरोक्त प्रमाणपत्रे/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’ मधील प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

३. अनुभवाच्या दाव्याच्या पृष्ट्यर्थ उमेदवारांनी संबंधित संस्थेच्या नाममुद्रीत पत्रावर सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले सविस्तर व परिपूर्ण अनुभव प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्यामध्ये उमेदवाराचे नाव, पदाचे नाव, पदाचा तपशील, वेतनश्रेणी, अर्जात दावा केलेल्या पदावरील अनुभवाचा कालावधी व पदावरील नेमणूकीचे स्वरुप इ.स्पष्ट असणे आवश्यक आहे.

४. विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करून विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘Certificate Upload’ या मेनूमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहील.

५. प्रमाणपत्रे विहित कालावधीत अपलोड न केल्यास अशा उमेदवारांचा निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- नवी मुंबई

उप सचिव, (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग